आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. मतदार याद्यांतील त्रुटी दूर कराव्यात या प्रमुख मागणीसाठी विरोधी पक्षांचा येत्या १ नोव्हेंबर रोजी मुंबईत मोर्चा.

2. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या नागरिकांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा, स्वदेशीचा स्वीकार करण्याचं आवाहन.

3. नागपूर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ई-रिक्षांचं वाटप.

4. तीन सामन्यांच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर ७ गडी राखून विजय.

<u>सर्वपक्षीय विरोधक मोर्चा</u>

राज्यातील मतदार याद्या सदोष असून यात मोठ्या प्रमाणात मतदार घुसविण्यात आल्याचा आरोप करत महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी येत्या १ नोव्हेंबर रोजी मुंबईत मोर्चाचं आयोजन केलं आहे. आज शिवसेना भवनात सर्व विरोधी पक्षांच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. राज्यातील मतदार याद्या निर्दोष करण्याची मागणी आम्ही निवडणुक आयोगाला केली होती, मात्र आयोग ऐकत नसेल तर आम्हाला रस्त्यावर उतरावं लागेल, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी यावेळी सांगितलं. तर एक नोव्हेंबरला मुंबईत होणाऱ्या मोर्चात सत्ताधारी पक्षांनीही सहभागी व्हावं असं राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले-

या पत्रकार परिषदेला संजय राऊत आणि जयंत पाटील यांसह मनसेचे बाळा नांदगावकर, काँग्रेसचे सचिन सावंत तसंच प्रकाश रेड्डी आदी नेते उपस्थित होते.

<u>राज्यपाल शुभेच्छा</u>

दिवाळीनिमित्त महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक असल्याचं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचं आवाहन राज्यपालांनी केलं आहे. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती

यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत सहभागी होण्याचं आवाहनही राज्यपालांनी आपल्या संदेशात केलं आहे.

<u>अयोध्या दिवाळी</u>

भगवान श्री राम यांच्या आगमनाचा सोहळा साजरा करण्यासाठी उत्तरप्रदेशात शरयू नदीच्या किनाऱ्यावर आज संध्याकाळी भव्य दीपोत्सव साजरा होत असून, यासाठी अयोध्या नगरी सजली आहे. राम की पौडी इथल्या ५६ घाटांवर आज २६ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित केले जातील. आज संध्याकाळी स्थानिक प्रशासनानं आयोजित केलेली भव्य शरयू आरती या कार्यक्रमाच्या दिमाखात आणखी भर घालेल.

<u>जीएसटी</u>

नुकत्याच लागू झालेल्या जीएसटी सुधारणांमुळे सणासुदीच्या दिवसांमध्ये खरेदीच्या उत्साहात भर पडली असून, यंदा ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्रमी विक्री होत आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी काल देशभरात १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त एकूण व्यापार झाल्याचा अंदाज असून,गेल्या काही वर्षांमधला हा सर्वात उत्साहाचा हंगाम ठरला आहे.

<u>आदी कर्मयोगी अभियान</u>

२०४७ च्या विकसित भारताचं उद्दिष्ट ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदी कर्मयोगी अभियानाचा शुभारंभ केला. त्यानंतर या अभियानाचं काम गडचिरोली जिल्ह्यातही सुरु झालं. आतापर्यंत ५२२ मोबाईल मनोरे उभारण्यात आले. मागील ३ महिन्यांमध्ये ४५३ ग्रामपंचायतींना भारतनेटशी जोडण्यात आलं. जिल्ह्यात ५५३ आदी सेवा केंद्रं स्थापन करुन सर्व गावांचा ग्राम विकास आराखडा तयार करण्यात आला. या कामाची दखल केंद्रस्तरावर घेऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांना नुकताच नवी दिल्लीत पुरस्कार प्रदान केलाआहे.

<u>काँग्रेस आंदोलन</u>

राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करावी तसंच कर्जमाफी करावी या मागणीसाठी काँग्रेस उद्या राज्यभर पिठलं भाकरी आंदोलन करणार आहे. शेतकऱ्यांवर मोठं संकट ओढवल्यामुळे त्यांना भरीव पॅकेज आणि कर्जमाफी देण्याची आवश्यकता होती. मात्र, सरकारने जाहीर केलेलं पॅकेज पुरेसं नसून तेही अद्याप शेतकऱ्यांना मिळालं नसल्याची टीका काँग्रेसने केली. राज्यातले सर्व जिल्हे, तालुका आणि गावागावात हे आंदोलन केलं जाणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसने दिली आहे.

ई-रिक्षा वाटप

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर तर्फे नागपूर जिल्ह्यातील गरजू दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आज ई-रिक्षाचे वाटप करण्यात आले. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या उपस्थितीत ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, इथं हा कार्यक्रम पार पडला. या उपक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील एकूण ५५५ गरजू दिव्यांग लाभार्थ्यांना ई-रिक्शा आणि मोटराईज्ड ट्रायसिकलचं वाटप करण्यात येणार असून हा उपक्रम दिव्यांग बांधवांच्या स्वावलंबनासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी सांगितलं.

देवेंद्र फडणवीस

दरम्यान, सिव्हील लाईन्समधील नियोजन भवन इथं महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, महाज्योतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज सायंकाळी होत आहे.

अपघात

वाशिम इथं समृद्धी महामार्गावर काल झालेल्या अपघातात दोन विदेशी पर्यटकांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. हे पर्यटक म्यानमारहून जगन्नाथ पुरीच्या दर्शनासाठी आले होते. वाहन चालकाचं नियंत्रण सुटून वाहन महामार्गाच्या कठड्यावर आदळून हा अपघात झाला. जखमींवर वाशिम जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पक्ष प्रवेश

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भंडारा जिल्हात मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेशाचे सत्र सुरू आहे. आज भाजप महिला जिल्हा उपाध्यक्ष कल्याणी भुरे यांनी नरेंद्र भोंडेकर यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. तुमसर नगर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भूरे यांचा पक्षप्रवेश शिवसेना शिंदे गटासाठी सकारात्मक असल्याचे चित्र दिसून येणार आहे, असं आमच्या प्रतिनिधीने सांगितलं.

## क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलियातल्या तीन सामन्यांच्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतावर सात गडी राखून विजय मिळवला आहे. तत्भापूर्वी ताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी डकवर्थ लुईस नियमानुसार १३१ धावांचं आव्हान ठेवलं होत. पावसाच्या सततच्या व्यत्ययामुळे सामना २६ षटकांचा करण्यात आला. भारतीय संघ २६ षटकांत १३६ धावाच करू शकला. त्याआधी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून क्षेत्र रक्षणाचा निर्णय घेतला. खेळाच्या सुरुवातीलाच सलामीवर रोहित शर्मा ८ तर कर्णधार शुभमन गिल १० धावा करून बाद झाले. तर विराट कोहलीला भोपळाही फोडता आला नाही. भारताकडून के एल राहुलनं सर्वाधिक ३८ धावा केल्या. भारताने ठेवलेलं लक्ष्य ऑस्ट्रेलियाने २१ षटकातच पूर्ण केलं.

## महिला क्रिकेट

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज इंदुर इथं यजमान भारत आणि इंग्लंड यांच्यात सामना होत आहे. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन सामन्यात पराभूत झाल्यामुळे भारतीय संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. तर इंग्लंड तिसऱ्या स्थानावर आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या 46 षटकांत 5 बाद 255 धावा झाल्या होत्या.

## चंद्रपूर अपघात

चंद्रपूर जिल्ह्यातल्या सावली तालुक्यातल्या हिरापूर इथं कालव्यात दोन जण वाहून गेले. चारा आणण्यासाठी काल एका कुटुंबातील आजोबा आणि नातू आसोलमेंढा तलावाच्या परिसरात गेले होते. तेव्हा झाडावर चढून पाला तोडताना नातवाचा तोल गेला आणि तो कालव्यात पडला. नातवाला वाचवण्यासाठी आजोबांनी कालव्यात उडी घेतली, मात्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने दोघेही वाहून गेले.

*****